# शार्लोट लेकसाठी 1 कोटी

म. टा. वृत्तसेवा, कर्जत

माथेरान हिलस्टेशनला पाणीपुरवठा करणारा शार्लेट लेक 'सस्टेनेबल डेव्हलमेंट ऑफ हिलस्टेशन्स' या योजनेतून, राज्य सरकारच्या मदतीने कात टाकणार आहे. एकंदर सहा कोटी रुपयांचा प्रस्ताव यासाठी तयार असून त्यापैकी एक कोटी रुपये तत्काळ मंजूर झाले आहेत.

रचना संसद कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमधील पल्लवी लाटकर आणि डिप्लोमाच्या अन्य विद्यार्थ्यांनी तलावाचा स्थितीदर्शक आढावा घेऊन काही सूचना केल्या आहेत. तलावाची उंची दोन मीटरने वाढवण्यात येणार असून संपूर्ण तलाव गाळ रहित होणार आहे. महाबळेश्वरच्या वेण्णा लेकच्या धर्तीवर या तलावात बोटिंगची सोयही केली जाईल.

तलावाच्या चारही बाजूंना राखीव पायवाट केली जाणार आहे. या पायवाटेवरून, नेचर ट्रेलचा आनंद पर्यटकांना घेता येईल.



अमित आर. कुलकर्णी

माथेरानात ब्रिटिशांनी वसाहत उभारण्यास सुरुवात केली तेव्हा पाण्याचा शोध घेत असता माथेरान डोंगराच्या पश्चिमेला नजरेत भरला. पुढे तेथे त्यांनी पाणी अडवून बंधारा बांधला. याच बंधाऱ्याचा विस्तार होत संपूर्ण माथेरानला पाणीपुरवठा करणारा तलाव अशी शार्लोट लेकची प्रसिद्धी सर्वतोमुखी झाली. मात्र, वर्षानुवर्षे दिवसेंदिवस त्याची पडझड आणि गाळ साचू लागल्याने व पाण्याची गळती होऊ लागल्याने पाणी साठा माथेरानसाठी अपुरा पडू लागला. उल्हास नदीतून येथे पाणी चढवण्याची वेळ आली.

पर्यटन स्थळ म्हणून वरचे स्थान मिळवण्यासाठी राज्य सरकारकडे शार्लेट लेक संदर्भात पाठपुरावा करण्यात आला असून हा संपूर्ण प्रोजेक्ट 'इको फ्रेन्डली' होणार असल्याची माहिती नगराध्यक्ष कुमार चौधरी व उपनगराध्यक्ष अजय सावंत यांनी 'मटा'ला दिली. उपयुक्तता आणि निसर्गसौंदर्य यांचा मिलाफ 'शार्लोट लेक'मध्ये ब्रिटिश काळापासून होता; तो आता पुन्हा पूर्ववत जपला जाणार आहे!